प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २९ जून २०२१**

# निसर्गसुंदर न्हावा बेटाचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव

सिडकोच्या अखत्यारितील न्हावा बेटावरील ६० हेक्टर क्षेत्रावर पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. करंजाडे व ठाणे खाडी किनाऱ्याने तिन्ही बाजूने वेढलेल्या व समोर ऐतिहासिक एलिफंटा लेण्यांचे दर्शन घडवणाऱ्या या बेटाचे पर्यटन स्थळाच्या अनुषंगाने विकास करण्याचे सिडकोने नियोजित केले आहे. या माध्यमातून महाराष्ट्रासोबतच नवी मुंबईतदेखील पर्यटन क्षेत्राच्या विकासात मोठी भर पडणार आहे.

**“सिडकोच्या प्रयत्नांमुळे न्हावा बेट हे नवी मुंबईतील पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरेल यात काही शंका नाही. या प्रकल्पामुळे नवी मुंबई सोबतच महाराष्ट्राचे नावदेखील पर्यटन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतले जाईल.”**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**

सदर बेट हे सध्या विकसित होत असलेल्या उलवे नोडपासून केवळ ५ कि.मी. अंतरावर आहे. तसेच मुंबई ट्रान्सहार्बर लिंकपासूनदेखील नजीकच्या अंतरावर आहे. ६० हेक्टरपैकी ३० हेक्टर क्षेत्र हे सीआरझेड – २ अंतर्गत येत असल्याने व नवी मुंबई विकास आराखड्यानुसार रीजनल पार्क झोनमध्ये याचा समावेश असल्याने या बेटाचा पर्यटन व विविध प्रकारच्या सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी विकास करण्याचा प्रस्ताव सिडको महामंडळाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रस्तावासाठी इच्छुक गुंतवणूकदार व खरेदीदारांमध्ये या प्रकल्पाविषयी उत्सुकता निर्माण व्हावी तसेच त्यांच्याकडून विविध सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी सिडकोतर्फे स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव प्रकाशित करण्यात आला आहे. या प्रस्तावाद्वारे इच्छुक अर्जदारांना सदर प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावर www.cidco.maharashtra.gov.in वर दिनांक २७ जून २०२१ पासून उपलब्ध करून देण्यात आली असून प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २९ जुलै २०२१ पर्यंत आहे.

सदर प्रस्तावांतर्गत प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्रायांचा विचार पूर्व अर्हतेसाठी करण्यात येणार नाही. तसेच प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्रायांचा समावेश विनंती प्रस्तावात करण्याचे अथवा न करण्याचे अधिकार सर्वस्वी सिडको महामंडळ राखून ठेवत आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**